(११७)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** अहमदनगर

**P.S.(ठाणे):** अहमदनगर कॅम्प

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0285

**Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/05/2023 00:04

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** शनिवार

**Date From (दिनांक पासून):** 01/04/2023

**Time Period (कालावधी):** पहर 7

**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/04/2023

**Time From (वेळेपासून):** 19:42 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 20:11 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 14/05/2023

**Time (वेळ):** 23:50 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 032

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/05/2023 23:50 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 3 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** अहमदनगर येथील औरंगाबाद रोड वरी,अजीज टवर्स नावाच्या, बिल्डींगच्या बेसमेंट मधील,ऑफिसमध्येअहमदनगर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** जावेद शेकुर शेख

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | किंग गेट रोड, आशिर्वाद,बंगला, राऊत हस्पिटल समोर, कोटला, अहमदनगर,अहमदनगर कॅम्प,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | किंग गेट रोड, आशिर्वाद,बंगला, राऊत हस्पिटल समोर, कोटला, अहमदनगर,अहमदनगर कॅम्प,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7020978335

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विवेक अशोक पवार सहाय्यक पोलीस निरीक्षक | | | 1. 302,शिशिर बिल्डिंग, शासकीय निवास,, डीएसपीचौक, अहमदनगर, अहमदनगर कॅम्प,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक:- 14/05/2023

माझे नांव जावेद शेकुर शेख, वय- 35 वर्ष, व्यवसाय- इमिटेशन ज्वेलरी विक्री, राहणार- किंग गेट रोड, आशिर्वाद बंगला, राऊत हॉस्पिटल समोर, कोटला, अहमदनगर मो. नं. 7020978335.

समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील नमुद ठिकाणी माझे कुटूंबासह राहण्यास आहे. दिनांक 22/02/2023 रोजी माझी बहिण आफरीन हिचा पती इम्रान बेग व त्याचा भाऊ इरफान बेग यांचेसह इतर यांचे विरुध्द कोतवाली पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक 178/2023 भारतीय दंड विधान 1860 चे कलम 143, 147, 148, 149, 307, 341, 324, 323, 504, 506 सह शस्त्र अधिनियम कलम 4 व 25 प्रमाणे दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार यांचेकडे असुन नमुद गुन्हयात माझ्या बहिणीचा नवरा इम्रान बेग यास अटक झाल्यानंतर तो जामीनावर होता. तसेच इतर सह आरोपी यांना दिनांक 31/03/2023 रोजी पावेतो अटक झालेली नव्हती. सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार यांनी मला दिनांक 31/03/2023 रोजी बोलावुन माझेकडे माझा मावस भाऊ/ नातेवाईक इरफान बेग व इतर सह आरोपी यांना गुन्हयात अटक न करण्यासाठि लाचेची मागणी केली. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नव्हती. त्यावेळी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे संपर्क करुन पोलीस निरीक्षक संदीप बबन घुगे यांचेकडे माझी तोंडी तक्रार सांगितली.

दिनांक 01/04/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कडील पोलीस निरीक्षक संदीप घुगे हे मला अहमदनगर येथे सापळा पथकासह व दोन शासकिय पंचासह येऊन भेटले. त्यावेळी त्यांना मी सांगितले की, माझे बहिणीचे पती श्री. इम्रान बेग यांचे अटक व जामीनाचे वेळी माझा कोतवाली पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. विवेक पवार यांचेशी परिचय झाला असून त्यांचेत व माझेत हिंदीत भाषेत संभाषण होते. त्यांनी मला दिनांक 31/3/2023 रोजी बोलावून घेतले व सांगीतले की,'' मैने तुम्हारे रिश्तेदार इरफान और दुसरे आरोपीयोको अब तक ढुंढकर अरेस्ट नही किया, उनको भी इम्रान बेग की तरह अरेस्ट कर जल्दी जमानत नही होने दुंगा, मैने एक महिने तक आपको अॅडजेस्ट किया अब आपके रिश्तेदार पाँचो लोगो के 10,000/- रूपये के हिसाब से 50,000/- रूपये मुझे लाके दो मै अँटीसिपेटरी बेल होणे तक उनको ढुंढने की कोशीश नही करुंगा ''

माझा मावस भाऊ श्री. इरफान बेग यास व त्याचे सह आरोपी असलेले इतर माझे नातेवाईक यांना अटक होवू नये अशी माझी ईच्छा आहे. परंतु तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. विवेक पवार हे मागणी करीत असलेले 50,000/- रूपये लाच देण्याची माझी ईच्छा नाही. तपास अधिकारी विवेक पवार हे मला मोबाईलवर फोन करून सांगत आहे की, मला एकाची माहिती मिळाली आहे आम्ही आता त्यांना अटक करू तुम्ही मला येवून भेटा. त्याप्रमाणे दिनांक 01/04/2023 रोजी मी त्यांची भेट घेण्यासाठी जाणार आहे. त्यावेळी ते माझेकडे लाचेच्या रक्कमेची मागणी करतील. तरी त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी.

अशा आशयाची लेखी तक्रार माझे हस्ताक्षरात लिहुन दिली. त्यावर मी सही केल्यानंतर सदर तक्रारीवर पोलीस निरीक्षक श्री. संदीप घुगे व पंचांनी सहया केल्या.

त्यानंतर माझे तक्रारीप्रमाणे कोतवाली पोलीस ठाणे , अहमदनगर येथे नेमणुकीस असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक अशोक पवार हे माझेकडे खरोखर लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करणेकामी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कडील पोलीस निरीक्षक श्री. संदीप घुगे यांनी माझ्याकडे शासकीय व्हाईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन मला व पंच श्री. मोहन लकडे यांना योग्य त्या सुचना देऊन सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार यांचे भेटीकामी रवाना करण्याचे ठरविले त्याचवेळी मला सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार यांचा माझे मोबाईलवर फोन आला त्यांनी मला डि.एस.पी. चौक, अहमदनगर येथे भेटण्यासाठी बोलाविले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. घुगे यांनी मला व पंच श्री. मोहन लकडे यांना सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार

यांचे भेटीकामी डि.एस.पी. चौक, अहमदनगर कडे रवाना केले. त्यानंतर औरंगाबाद रोड वरील डि. एस. पी. चौक जवळ, अहमदनगर येथील माझ्या कार्यालयात माझी व सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार यांची भेट झाली. त्यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार मला म्हणाले कि, चलो, तीस हजार कर दो जान दो, पाच लोगो के छह- छह. त्यावर मी सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार यांना म्हणालो कि, दो के लेलिए तुमने, त्यावर ते म्हणाले कि, ओ तो उसने अलगसे कराया है, तीस दो. त्यावर मी त्यांना कमीजास्त करण्यास सांगुन पच्चीस हजार एकदम सही है असे म्हणालो. त्यावर सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार यांनी होकार दिला व उर्वरीत पाहिजे असलेले आरोपी यांचा अटकपुर्व जामिन बाबत चर्चा करून जो पर्यंत त्यांना जामिन होत नाही तोपर्यंत त्यांना लपुन राहण्याबाबत सांगणे बाबत मला सुचना दिली. त्यावर मी त्यांना त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम उदया आणुन देतो असे सांगितले असता त्यांनी '' कल नही मिलुंगा, कल बंदोबस्त हैं हमारा, कल श्याम को इधरही '' असे म्हणुन मागणी केलेली लाचेची रक्कम दिनांक 02/04/2023 रोजी संध्याकाळी माझ्या अहमदनगर येथील औरंगाबाद रोड वरील डी.एस.पी.चौकाजवळील अजीज टॉवर्स नावाच्या बिल्डींग मधील बेसमेंट मधील कार्यालयात देणे बाबत सांगितले.

दिनांक 02/04/2023 रोजी मी सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार यांना लाच म्हणुन देणेकामी 25,000 /- रुपये पोलीस निरीक्षक घुगे यांचे समक्ष हजर केले. त्याबाबत त्यांनी सापळापुर्व पंचनामा करुन मला सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार हे कोठे भेटतील याबाबत विचारणा करण्यासाठी सांगितले. म्हणुन मी दिनांक 02/04/2023 रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार यांना माझा मोबाईल क्रमांक 7020978335 यावरुन त्यांचा मोबाईल क्रमांक 9067067664 यावर 20/32 वाजेचे सुमारास फोन केला असता त्यांनी '' थोडा पाहुणे आये ना मेरे साथ '' तसेच '' नाईट है मेरेको आज'' असे म्हणुन त्याच रात्री अकरा बारा वाजेच्या सुमारास लाचेची रक्कम स्विकारणेकामी संपर्क करतो असे सांगितले सदर बाबत पोलीस निरीक्षक संदीप घुगे यांनी पंचनामा केला आहे.

दिनांक 03/04/2023 रोजी मी पुन्हा पोलीस निरीक्षक संदीप घुगे व त्यांचे सोबत असलेल्या सापळा पथकाची भेट घेतली. त्यावेळी मी माझे मोबाईल क्रमांक 7020978335 यावरुन सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार याचे मोबाईल क्रमांक 9067067664 यावर 12/49 वाजेचे सुमारास पुन्हा फोन केला त्यावेळी ते कामानिमित्त पुणे येथे असल्याचे सांगुन संध्याकाळी अहमदनगर येथे आल्यावर भेटतो असे सांगितले. त्यानंतर मी संध्याकाळी सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार यांना संपर्क केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. यावरुन सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार यांना माझा संशय आल्याने ते पैसे घेण्यास टाळाटाळ करीत आहेत असे मला वाटले. सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार हे त्यांनी मागणी केलेल्या लाचेच्या अनुशंगाने मला संपर्क करतील त्यावेळी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कडील पोलीस निरीक्षक संदीप घुगे यांना पुढील कारवाई कामी कळविन असे दिनांक 03/04/2023 रोजी कळविले होते.

परंतु त्यानंतर दिनांक 08/05/2023 रोजी पावेतो सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार, नेमणुक- कोतवाली पोलीस ठाणे, अहमदनगर यांनी माझ्याकडे मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारणेकामी मला संपर्क केला नाही व दरम्यानचे कालावधीत 1) इरफान ईस्माईल बेग 2) अरबाज राशिद सैय्यद 3) शाहरुख राशिद सैय्यद 4) सरफराज सैय्यद यांना मा.न्यायालयाकडुन अंतरिम जामीन (Interim Bail) मिळालेला आहे.

त्यामुळे सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार हे आता माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत अशी माझी खात्री झाली आहे.

तरी, कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे नेमणुकीस असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक अशोक पवार हे लाच मागणी पडताळणी कारवाई वेळी दिनांक 01/04/2023 रोजी 19/42 वाजे ते 20/11 वाजेचे दरम्यान मला आमच्या अहमदनगर येथील औरंगाबाद रोड वरील अजीज टॉवर्स नावाच्या बिल्डींगच्या बेसमेंट मधील ऑफिसमध्ये भेटले. त्यावेळी त्यांनी ते तपास अधिकारी असलेल्या कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर येथील दाखल गुन्हा रजिष्टर नंबर 178/2023 भारतीय दंड विधान 1860 चे कलम 143, 147, 148, 149, 307, 341, 324, 323, 504, 506 सह शस्त्र अधिनियम 1959 चे कलम 4, 25 प्रमाणेच्या गुन्हयात माझ्या बहिणीचे पती इम्रान बेग याचेबरोबर असलेले सहा सहआरोपी पैकी सह आरोपी नामे इरफान, सरफराज, शाहरुख व अरबाज यांना अटकपुर्व जामीनासाठी मदत व्हावी म्हणुन व दाखल गुन्हयात अटक न करण्याचे मोबदल्यात बेकायदेशिर, अप्रामाणिकपणे वर्तन करून आपले कायदेशिर कर्तव्य पार न पाडता त्यांचे लोकसेवक पदाचा दुरुपयोग करून भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वतःच्या आर्थिक फायदयासाठि माझेकडे पंच साक्षीदार यांचे समक्ष पैश्याच्या स्वरूपात तीस हजार ( 30,000/-) रुपये लाचेची मागणी करत तडजोडअंती पंचवीस हजार ( 25,000/-) रुपये ची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले म्हणुन माझी विवेक अशोक पवार, वयः- 35 वर्ष , सहाय्यक पोलीस

निरीक्षक, नेमणुक:- कोतवाली पोलीस ठाणे, अहमदनगर, सध्या राहणार:- फ्लॅट नंबर 302, शिशिर बिल्डिंग, शासकीय निवास्थाने, डी.एस.पी.चौक, अहमदनगर यांचे विरूध्द फिर्याद आहे.

माझी मराठी भाषेत टंकलिखित केलेली फिर्याद मी वाचली असुन ती मला समजली आहे, ती माझे सांगणेप्रमाणे व घडल्या घटनेप्रमाणे बरोबर टंकलिखित केलेली आहे.

समक्ष हि फिर्याद दिली.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

dinkar sakharam munde(SI (Sub-Inspector)) / **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही)

पोलीस ठाणे अंमलदार